# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 01/08/2020 (शनिवार)
(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 03 किमी अंतरावर मौजा कोदामेंढी शिवार येथे दिनांक 31/07/2020 चे 04.00 वा. दरम्यान काही लोक जे.सी.बी. चे सहायाने सुर नदीचे पात्रातील अवैधरित्या चोरी करून ट्रॅक्टर ट्राली व्दारे वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून सपोनि विवेक सोनवणे यांनी विभागीय गस्त दरम्यान कार्यवाही करून जे.सी.बी., तीन ट्रक्टर ट्राली, 3 ब्रास रेतीसह एकुण कि. 30,06000/–रू. मुद्देमाल ताब्यात घेवुन रेती चोरी करणारे आरोपी नामे– 1) अमोल धनराज पिसे, वय 24 वर्ष, रा. चोखाळा, 2) राजकुमार रामदयाल राउत, वय 26 वर्ष, रा. चोखाळा, 3) मोरेश्वर काशीराम हटवार, वय 42 वर्ष, रा. चोखाळा व 4) नरेंद्र उर्फ तात्या उत्तम चौधरी, वय 27 वर्ष रा. भांडेवाडी यांना ताब्यात घेण्यात आले.

सदर प्रकरणी सर तर्फे सहायक पोलिस निरीखक विवेक सोनवणे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहा. फौ. हंसराज वरखडे 9823271704 हे करीत आहे.



## विनयभंग

पो.स्टे. मौदा :– दि. 27/07/2020 चे 16:00 वा. चे सुमारास 17 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि मौदा येथे पुस्तक घेणे करीता आली, परत जात असता लापका येथे थांबली असता आरोपी नामे– अतुल तुळशिराम ढोमने, रा. आजनगाव, ता. मौदा हा तीथे छोटा हाथी घेउन थांबला व गावाला येते का, असे म्हटले असता पीडिता ही गाडीवर आरोपीच्या साईडला बसली काही अंतरावर गेला असता आरोपीने पीडितेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग करून केला. दरम्यान पीडिता ओरडली असता गावात राहनारा एक इसम याला ओरडतांनी दीसली त्याने छोटा हाती थांबवन्याचा प्रयत्न केला. आरोपीने गाडी न थांबवता पुढे आजनगाव चौक येथे थांबवली पीडिता नंतर तेथुन नीघुन गेली. यानंतर सुद्धा आरोपीने वारंवार अश्लिल चाळे केल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(अ)(1)(आय) भादंवि. सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ठाकुर 7083151993 हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. सावनेर :– फिर्यादी नामे– सौ. काजल रितीक मोरे, वय 21 वर्ष, रा. नांदीखंडा, ता. कळमेश्वर, जि. नागपुर व आरोपी नामे– 1) पति– रितीक प्रकाश मोरे, रा. नांदीखंडा, ता. कळमेश्वर, जि. नागपुर हे दोघेही पती पत्नी आहेत. अंतर्गत मौजा नांदीखेडा येथे दिनांक 18/06/2020 चे पुर्वी आरोपी नामे– 1. व 2) प्रकाश मोरे (सासरे) व 3) उषा प्रकाश मोरे (सासू) यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. तसेच आरोपीतांनी "तु घरी परत आली तर तुझे हातपाय तोडुन टाकीन अशी धमकी दिली. महिला बाल विकास विभाग अभयकेन्द्र संरक्षण अधिकारी जि नागपुर यांचे लेखी पत्रावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 506, 34 भादंवी. सहकलम 3, 4 हुंडाबळी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ गुप्ता 9511247261 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर